I J R S S I S, Vol. (IX), Issue (1) Jan 2023: 187-192
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मानव संसाधन व्यवस्थापन अंतर्गत स्त्रियांचे लघुउद्योगातील योगदान

माधुरी ना. कोकोडे
श्री गोविंदप्रभू कला व वाणिज्य महाविद्यालय, तळोधी (बा.), जिल्हा चंद्रपूर (म.रा.)

Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023 Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023

**सारांश :** २१ व्या शतकातील स्त्रीने घराचा उंबरठा ओलांडून शिक्षण घेवुन आत्मविश्वासाने फुललेले तिचे व्यक्तिमत्व आणि राजकारण, समाजकारण, औद्योगिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपल्या ज्ञानाने, कला, कौशल्य, योग्यता व सकारात्मक मनोवृत्तीने भरारी घेतांना दिसत आहे. स्त्री उपजतच जिद्द, चिकाटी, कष्ट करण्याची तयारी, कल्पकता, विनम्रता, विनयशिलता, सहानुभूती आणि सहनशिलता या सर्व मानविय साधनसंपत्ती उपयोग करूण विविध लघुउद्योगात क्रियाशिल आहे.गृहउद्योग, ब्युटी पार्लर, हेल्थ क्लब, जाहिरात व्यवसाय, फॅशन डिझायनिंग, कपडे, खाण्याचे पदार्थ अशा विविध प्रकारचे लघुउद्योगात आपले कौशल्य दाखवून स्त्रिया कौटूंबिक, आर्थिक उत्पादनात हातभार लावतांना दिसतात हाच आशय घेवून मानव संसाधन व्यवस्थापन अंतर्गत स्त्रियांचे लघुउद्योगातील योगदान हा विषय संशोधनाकरीता घेण्यात आला या संशोधनाचा उद्देश मानव साधनसंपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत संशोधन क्षेत्रातील स्त्रियांच्या लघुउद्योगाबद्दल अभ्यास करणे, स्त्रियांच्या आर्थिक विकासातील वाटचालीची माहिती प्राप्त करणे व स्त्रियांचे मनोबल वाढविणे हा आहे . हे संशोधन विश्लेषणात्मक व चिकित्सक पद्धतीचे आहे. उपरोक्त संशोधन विषय माहिती संकलित करून प्राथमिक व दुय्यम या दोन्ही स्त्रोताद्वारे मांडण्यात आले.
**बिजशब्द :** मानव संसाधन, व्यवस्थापन, स्त्री, लघुउद्योग, योगदान

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकातील स्त्रीने घराचा उंबरठा ओलांडून शिक्षण घेऊन आत्मविश्वासाने फुललेले तिचे व्यक्तिमत्व आणि राजकारण, समाजकारण, औद्योगिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपल्या ज्ञानाने, कला, कौशल्य, योग्यता व सकारात्मक मनोवृत्तीने भरारी घेतांना दिसत आहे. आधुनिक काळात विविध क्षेत्रात स्त्रिया आपल्या योग्यता व कौशल्य च्या आधारावर भरीव काम करतांना दिसतात. आपल्या आकांक्षा व कर्तृत्वाचे पंख पसरून स्वत:ची ओळख निर्माण करतांना दिसतात. स्त्रीची जिद्द व धडपडीवृत्ती, कष्ट करण्याची तयारी ही सर्वच मानवी साधनसंपत्ती असल्यामुळे एक उत्तम गृहिणी, कर्तबगार पंतप्रधान, राष्ट्रपती, उद्योजक, संचालक अशी पदे यशस्वीरीत्या सांभाळू शकते. जागतिक अर्थव्यवस्थेच्या तुलनेत ५५ टक्के योगदान देतांना दिसते. १९९४ साली महाराष्ट्र सरकारने नवे महिला धोरण जाहीर केले. या विशाल धोरणामुळे स्त्री-विकासाच्या आकांक्षा पुन्हा नव्याने पल्लवित झालेल्या होत्या. या धोरणात स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक विकासावर विशेष भर होता. 'राज्यातल्या ३.८ कोटी महिलांना आवाज देणारे धोरण' असे वर्णन तेव्हा 'इंडिया टूडेने' केले. या धोरणामुळे स्त्रियांना राखीव जागांबरोबरच, आर्थिक सहाय्य पण नवनवीन प्रकल्पांसाठी, स्वयंरोजगारांसाठी, लघुउद्योगासाठी मिळाला. या सवलतींचा जास्तीत जास्त फायदा नव्याने पुढे येणाऱ्या तरुण उद्योजकांना मिळाला. समाजामध्ये स्त्रियांना मान, सन्मान, प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी, समाजामध्ये सर्वांगिन विकास व्हावा. याकरीता शासनाने आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी महाराष्ट्र महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची निर्मिती केली.

कौटूंबिक जबाबदरी समर्थपणे पेलणाऱ्या स्त्रियासुद्धा घराबाहेरचे आव्हान मोठ्या जिद्दीने, चिकाटीने स्विकारलेले आहे. तिची संसार सांभाळण्याची, चालविण्याची पद्धत ही एखाद्या उद्योगाच्या व्यवस्थापनाशी अगदी मिळती जुळती असते. कुटूंबातील विविध कार्यावर निर्णय घेणे, विचार करणे, संयोजन करणे आणि हाती घेतलेले काम शेवटपर्यंत न खचता पूर्ण करणे ही योग्यता स्त्रिमध्ये असते.

विविध लघुउद्योगात स्त्रीचे फार मोठे योगदान आहे. छोटे-छोटे लघुउद्योग, गृहउद्योग, ब्युटी पार्लर, हेल्थ क्लब, जाहिरात व्यवसाय, फॅशन डिझायनिंग, कपडे, खाण्याचे पदार्थ अशा विविध प्रकारचे लघुउद्योगात आपले कौशल्य दाखवून कौटूंबिक, आर्थिक उत्पादनात हातभार लावतात. स्त्रीयांमध्ये उपजतच जिद्द, चिकाटी, कष्ट

करण्याची तयारी, कल्पकता, विनम्रता, विनय, शिलता, सहानुभूती आणि सहनशिलता या सर्व मानविय साधनसंपत्ती उपजतच असतात. गरज पडेल त्या प्रसंगानुसार आपल्या गुणांना प्रोत्साहित करण्याची, प्रदर्शित करण्याची आणि उद्योग करणाऱ्या महिलांना प्रेरणेची गरज आहे. श्रीमती प्रभा ठकारांनी छंद म्हणून हौसेने शिक्षण या मानवीय संसाधनाच्या व्यवस्थापनातून बाटिक कला कौशल्याचे आज फार मोठ्या आंतरराष्ट्रीय उद्योगात रूपांतर झालेले आहे. "Dimpex International Exporters" असे त्यांच्या औद्योगिक क्षेत्राचे नाव आहे. त्यामध्ये तयार झालेल्या बाटिक प्रिंटच्या साड्या, पंजाबी कुर्ते, पर्सेस, कुशन कव्हर्स यांना परदेशांत फार मोठी मागणी असते. रेशमा होडीवाला यांच्या लेदर गारमेंटस्ना पण परदेशांत फार मोठी मागणी आहे.

मानव संसाधन व्यवस्थापन हा एक अत्यंत महत्वपूर्ण असा विषय आहे. या अंतर्गत व्यवस्थापनातील मानवी घटकांबाबत असणाऱ्या सर्व पैलुंचे अध्ययन आवश्यक आहे. व्यवस्थापन केले तर त्या व्यक्तिचे किंवा संस्थेचे उद्दिष्ट्य योग्य रितीने साध्य होते. कोणत्याही उद्योगाचा विकास हा नैसर्गिक, वित्तीय व मानवी संसाधनाच्या उपलब्धतेवर आणि संसाधनाच्या प्रभावी उपयोगावर अवलंबुन असते. प्रत्येक क्षेत्रात विकास प्रक्रियेत इतर घटकांप्रमाणे मानवी संसाधन हा घटक महत्वाचा आहे. मानव संसाधन हा एखाद्या व्यक्तिच्या गुणांचा आणि कौशल्यांचा एक संच आहे. जो विशिष्ट प्रकारची क्रियाकलाप करण्याची क्षमता दाखवितो. मानवी संसाधन संकल्पना एखाद्या व्यक्तिच्या शारीरिक, मानसिक व भावनिक क्रियाकलापाबद्दलची क्षमता असते. जी उत्पादक क्रियाकलापांमध्ये प्रभावीपणे सहभागी होण्यास मदत करते. कोणत्याही उद्योगाचा विकास हा तेथील आणि त्या संसाधनाचा प्रभावी उपयोग यांवर अवलंबून असते. सर्वच क्षेत्राच्या विकास प्रक्रियेत मानव संसाधन महत्वाचा घटक आहे. मानव संसाधन व्यवस्थापन ही एक व्यापक संकल्पना आहे. प्रत्येक क्षेत्रात उद्योग किंवा व्यवस्थापनात आवश्यक असलेले कामगार, तंत्रज्ञ, व्यवस्थापक मिळविण्यापासून ते सर्व आवश्यक सोयी, सुविधा, योग्य वेतन, सुरक्षितता आणि न्यायाची वागणूक मिळवून देईपर्यंतच्या अनेक घटकांचा मानव संसाधन विकास या संकल्पनेत समावेश होते. मानव संसाधन विकास प्रक्रियेतूनच प्रत्येक उद्योग आणि संस्थेला आवश्यक तो कुशल कामास कुशल कामगार वर्ग प्राप्त होणे शक्य होते. मानवी संसाधने, उद्योजकीय कौशल्य असलेले नेते, पात्र कर्मचारी, क्षमता (ज्ञान, क्षमता, कौशल्य), संघ तंत्र आणि पद्धती, बाह्य कंत्राटदारांसोबत कर्मचाऱ्यांचा संवाद या मानवीय संसाधनाच्या भूमिकेला विशेष महत्व आहे. म्हणूनच मानव संसाधन विकास ही संकल्पनेला वर्तमान काळात अधिक महत्व प्राप्त झाले आहे. सर्व क्षेत्रातील मानव संसाधनात सकारात्मक वाढ करणे, आत्मविश्वास, मनोबल वाढविणे, त्यांची कार्यप्रवृत्ती वाढविणे इत्यादी दृष्टिकोन क्षमतेचा विकास करणे या सर्वांचा मानव संसाधन विकास प्रक्रिया म्हणतात.

१९६९ साली "अमेरिकन सोसायटी फॉर ट्रेनिंग ॲण्ड डेव्हलपमेंट" या संस्थेने आयोजित केलेल्या अधिवेशनात लिओनार्ड नाडलेर यांनी सर्वप्रथम 'मानवी संसाधन विकास' या संकल्पनेची परिभाषा केली. "Human Resource Development refers to those learning experiences which are organized for a specific time and designed to bring about the possibility of behavioural change."

कोणताही व्यवसाय यशस्वी दृष्टीने पूर्ण होणे आणि यशापयशाचे श्रेय कुशल मानव संसाधनाला जाते. मानवाजवळ असणाऱ्या किंवा मानवाशी संबंधित असलेल्या संसाधनांचा ज्यामध्ये समावेश होतो. त्या साधनसंपत्तीला मानवीय साधनसंपत्ती म्हणतात. शक्ती, आवक, योग्यता, ज्ञान, मनोप्रवृत्ती आणि वेळ या मानवीय साधनसंपत्ती होय.

भारतासारख्या देशात लोकशाहीचा स्विकार झाल्यामुळे प्रत्येक भारतीय स्त्रिला सन्मानाने जगण्याचा, शिक्षण घेण्याचा, विचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क आहे. वर्तमान काळात खेडे, नगर व शहरात लघुउद्योग निर्मितीतून ब्युटीपार्लर, हेल्थ क्लब, फॅशन डिझायनिंग, फुड प्रॉडक्टस अशा विविध व्यवसायात आपले कौशल्य दाखवून कुटूंबाच्या आर्थिक उत्पन्नाला हातभार लावत

आहे व स्त्रिचे व्यक्तिमत्व प्रगल्भ झाले आहे. तर उद्योग व्यवसाय क्षेत्रातील अनुभवांमुळे तिच्या कर्तृत्वातून विशेष झळाळी प्राप्त झालेली आहे. हाच आशय घेवून ब्रम्हपुरी नगरीतील मानव संसाधन व्यवस्थापन अंतर्गत स्त्रियांचे लघुउद्योगातील योगदान हा विषय संशोधनाकरीता घेण्यात आला.

**साहित्य पुनरावलोकन :**

पुण्यासारख्या शहरात महिला वर्गाचा या क्षेत्रात प्रचंड सहभाग दिसून येतो. 'Advance Exhibitions' च्या संचालिका श्रीमती माधुरी पाटील यांचा गृहोपयोगी, इलेक्ट्रॉनिक्स आणि विविध वस्तूंचे औद्योगिक प्रदर्शन भरवितात. केवळ तीन ते चार वर्षात पुणे, नगर, नाशिक, औरंगाबाद अशा विविध शहरांत २५ प्रदर्शने भरवून त्यांनी फार मोठे रेकॉर्डच केले आहे. या प्रदर्शनांमुळे उद्योजकांना, महिला उद्योजकांना एक छानशी बाजारपेठ आपोआपच मिळते. कारण त्यामध्ये केवळ प्रदर्शन हा हेतू नसून विक्री हेही उद्दिष्ट असते. या क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान फार मोलाचे आहे.

पुण्याच्या सुमतीबाई हार्डीकर यांचा नर्सरी हा लघुउद्योग अतिशय सुंदर आहे. या नर्सरीत विविध रोपे तयार करून त्यांची विक्री त्या करतात. याशिवाय त्यांच्या 'नारायण गुलकंदा' च्या उत्पादनाला पण खूप मागणी असते. उन्हाळ्यात त्यांच्या 'सहस्य नारिंगी सरबत' फार प्रसिद्ध आहे. चिंचवड येथील पुष्पलता बांठिया यांचा 'स्प्रे ऑल' हा औद्योगिक क्षेत्रासाठी लागणाऱ्या रंगांचा फार मोठा कारखाना आहे. घरातील आर्थिक समस्या सोडवतांना अगदी थोड्याशा भांडवलावर हा उद्योग सुरू करुन आज त्या त्या क्षेत्रातील फार मोठ्या महिला उद्योजक झालेल्या आहेत.

श्रीमती मंगला धर्माधिकारी यांचे लक्ष्मी एंटरप्रायझेस म्हणजे कलाकौशल्याच्या नमुन्यांचे रंगीबेरंगी क्षेत्रच! त्यांचा व्यवसाय मोठा कलात्मक आहे. विविध प्रकारच्या हॅण्डबॅग्ज, शबनम, पिशव्या, महाराष्ट्रीयन वैशिष्ट्यपूर्ण चंची या सर्व प्रकरांवर नाजूक नक्षीकाम, आकर्षक रंगसंगती असल्यामुळे या वस्तूंची लोकप्रियता सतत वाढत असते. अशा किती तरी कर्तबगार महिलांची नावे औद्योगिक क्षेत्रात लघुउद्योग निर्माण करुन भविष्यात आघाडीवर आहेत. त्यांनीही अनेक समस्यांना, अडचणींना तोंड दिले आहे. त्यांनाही आर्थिक समस्या आल्या असतील, काही वेळा अपयशही आले असेल. पण त्या सर्वांवर धैर्याने मात करुन त्यांनी आपली यशस्वी वाटचाल आजही चालू ठेवली आहे.

**उद्दिष्टये :**

१. मानव साधनसंपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत संशोधन क्षेत्रातील स्त्रियांच्या लघुउद्योगाबद्दल अभ्यास करणे.

२. संशोधन क्षेत्रातील स्त्रियांच्या आर्थिक विकासातील वाटचालीची माहिती प्राप्त करणे.

३. संशोधन विषयावरील उपलब्ध साहित्याचे पुनरावलोकन करणे.

४. या संशोधनाच्या माध्यमातून स्त्रियांचे मनोबल वाढविणे.

**संशोधन पद्धती :**

'मानव संसाधन व्यवस्थापन अंतर्गत स्त्रियांचे लघुउद्योगातील योगदान' हे संशोधन विश्लेषणात्मक व चिकित्सक पद्धतीचे आहे. कारण या मध्ये स्त्रियांचे मानव संसाधन व्यवस्थापन अंतर्गत लघुउद्योगातील क्रियाशिलता व त्यामधुन स्वावलंबन, स्वयंपूर्णता व आर्थिक विकास या बाबत विश्लेषण तसेच चिकित्सक पद्धतीने वर्णन केले आहे.

**तथ्य संकलन :**

उपरोक्त संशोधन विषयावर माहिती संकलित करतांना प्राथमिक व दुय्यम या स्त्रोतांचा अभ्यास करण्यात आला.

**अ) प्राथमिक स्त्रोत –**

या संशोधनामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी नगरातील लघुउद्योग करणाऱ्या २५ स्त्रियांची भेट व मुलाखत घेवून त्यांच्या लघुउद्योगाचा अभ्यास करण्यात आला त्याचबरोबर निरीक्षण व चर्चाद्वारे माहिती संकलित केली आहे.

**ब) दुय्यम स्त्रोत –**

या संशोधनात प्राथमिक स्त्रोताबरोबरच विषयासंबंधी अधिक माहिती संकलित करण्याकरीता मासिके, अहवाल, लेख, ठराव, पुस्तके, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधन सुद्धा तथ्य संकलनाकरीता उपयोगी ठरले आहे.

**माहितीचे विश्लेषण :**

स्त्री ही क्षणाची पत्नी व अनंत काळची माता आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी ही

स्त्रीची ओळख. तसेच वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीता अध्याय २१ महिलोन्नती ओवी नं...... स्त्रियेसारखी मोहिणी नाही, स्त्रियेसारखी मुलायम नाही, स्त्रियेसारखी वैरागीनी नाही आणि कठोर रनचंडिका याच संदर्भावरून असे मांडता येईल की स्त्री ही आपल्या कुटूंबासाठी सकाळी सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत आपल्या श्रम, शक्ती, कौशल्य, सकारात्मक वृत्ती, आवड, योग्यता या सर्व मानवीय साधनांचे व्यवस्थापन करुन एक आदर्श सुखी कुटूंब निर्माण करते. मनुस्मृतीला तिलांजली देत आपल्यातील प्रेम वात्सल्यातून, कुटूंब वात्सल्यता निर्माण करते.

स्त्री शक्तीचं खरे स्वरूप हे येणाऱ्या असंख्य प्रसंगांना तोंड देणाऱ्या संकटसमयीच फार कौशल्याने, संयमाने या मानवीय साधनसंपत्तीला शस्त्र म्हणून वापर करते आणि फार प्रगल्भाने जागृत होते.

वरील तालिकेवरून स्पष्ट होते की, ०६ (२४:) प्रतिशत स्त्रिया आर्थिक अडचणीमुळे लघुउद्योग करतात. ०५ (२०:) प्रतिशत स्त्रिया आर्थिक स्वातंत्र्य मिळावे या उद्देशाने लघुउद्योग करतात. ११ (५६:) प्रतिशत स्त्रिया कुटूंबात कोणत्याही आर्थिक अडचणी नसतांना स्वत:ची स्वतंत्र ओळख, स्वत:च्या कला, कौशल्य, आवड व जीवन जगण्याची स्वतंत्र शैली याकरीता लघुउद्योग करतात.

शिक्षणाने आधुनिक स्त्रिचे व्यक्तिमत्व प्रगल्भ झाले आहे. तर लघुउद्योग क्षेत्रातील अनुभवांमुळे तिच्या व्यक्तिमत्वाला झळाळी प्राप्त झाली आहे. कौटूंबिक जबाबदारी समर्थपणे पेलणारी स्त्री घराबाहेरचं आव्हान उपजत असलेल्या गुणांच्या आधारे आपल्या लघुउद्योगात पोषक पद्धतीने उपयोग करीत आहे.

वरील तालिकेवरून स्पष्ट होते की, १९ (७६:) प्रतिशत स्त्रिया लघुउद्योगातून आपली आर्थिक स्थिती चांगली आहे असे म्हणतात तर ०६ (२४:) प्रतिशत स्त्रिया लघुउद्योगातून आपली आर्थिक स्थिती मध्यम आहे असे म्हणणाऱ्या आहेत व लघुउद्योगातून आर्थिक स्थिती निम्न आहे असे उत्तर देणाऱ्या स्त्रिया निरंक आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, स्त्रियांनी उभारलेल्या लघुउद्योगातून त्यांची आवड, कला, कौशल्यांना वाव मिळणे, आत्मविश्वास वाढणे, स्वतंत्र ओळख निर्माण होणे या सोबतच कुटूंबाचा आर्थिक स्तर वाढविण्यास, कुटूंबाच्या गरजा पूर्ण करण्यास स्त्रियांचे मोलाचे योगदान आहे.

**निष्कर्ष :**

१) संपूर्ण जगात स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत.

२) स्त्रिया स्वत:च्या आवडी, कला, कौशल्य, मेहनत, जीद्द, चिकाटी या मानवीय साधनसंपत्तीच्या योग्य व्यवस्थापनातून स्वावलंबी होवून लघुउद्योगाच्या माध्यमातून कुटूंबाला आर्थिक सहाय्य करीत आहेत.

३) आर्थिक दृष्टचा स्वावलंबी होवून समाजात स्वत:ची ओळख निर्माण करत आहेत.

४) ग्रामीण स्त्रियाचा आत्मविश्वास वाढुन स्वावलंबी, स्वयंपूर्ण होण्यासाठी लघुउद्योग व कुटीर उद्योगांची भूमिका महत्वपूर्ण आहे.

५) लघुउद्योगातील स्त्रियांच्या भरीव योगदानामुळे गरिबी, बेरोजगारी आणि निरक्षरता या चक्रव्यूहातून बाहेर पडून त्या स्वावलंबी व सक्षम होत आहेत.

६) कुटूंबात आणि समाजात आदराचे स्थान निर्माण झाले आहे.

७) कुटूंबातील निर्णयांमध्ये स्त्रियांना महत्वपूर्ण स्थान मिळाले आहे., स्वावलंबी, स्वयंपूर्ण होत असल्यामुळे स्त्रिया कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक विकासात भरीव योगदान देत आहेत.

८) शासनाच्या विविध लघुउद्योग योजनांमधुन स्त्रियांना लघूउद्योग करण्यास बळ मिळत आहे.

**शिफारशी :**

१) या लघुउद्योगांमधून स्त्रिया आपल्या कला, कौशल्य, छंद व स्वत:च व्यक्तिमत्व फुलवू शकतो. हा ध्येयवाद प्रत्येक

स्त्रिच्या मनात असायलाच पाहिजे.

२) स्त्रिचं कर्तृत्व घरात आणि घराबाहेर सर्वार्थाने फुलविण्यास स्वातंत्र्य दिलं पाहिजे.

३) स्त्री स्वावलंबी, स्वयंपूर्ण, सक्षम होण्यास पुरूषांनी तिला प्रोत्साहन देवून मनोबल वाढविण्यास सहकार्याचा हात

दिला पाहिजे.

४)स्त्री आपले पंख पसरून कर्तृत्वाची भरारी घेत असतांना स्वत:च्या घराकडे दुर्लक्ष करेल ही भिती बाळगू

नये. प्रत्येक स्त्रिला आपलं घर, पती, मुलं, त्यांचं स्वास्थ सुरक्षितता आनंद हवा असतो. त्यासाठी स्वत:च दोनाचे चार हात म्हणजे सर्व मेहनत, कष्ट, वेळेचं नियोजन करुन आपल्या कला, कौशल्यांचा वापर करुन घर आणि उद्योग उत्कृष्टपणे सांभाळत असते. मात्र त्या भावनांचा, विचारांचा, कौशल्यांचा आदर करुन स्त्रिला सहकार्य करुन प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.

५) यातून महिलांच्या स्थितीला सकारात्मक बदल घडून जनजागृती होईल. नवीन येणाऱ्या पिढीला आदर्श मिळेल.

६) शासनाच्या विविध लघुउद्योग योजनांचा स्त्रियांनी लाभ घ्यावा.

७) आधुनिक काळात नौकरी मिळविणे अवघड होत आहे. त्यामुळे लघुउद्योगांमधून स्त्रिया आपल्या मानवीय साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनातून स्वत:च कुटूंबाचा आर्थिक गरजा पूर्ण करू शकते व स्वतंत्र ओळख निर्माण करुन व्यक्तिमत्व फुलवू शकते.

**संदर्भ :-**

womenchild.maharashtra.gov.in

mr.wikipedia.org/wiki/ ekuo lalk/ku O;oLFkkiu

इंदिरा खडसे – कौटूंबिक साधनसंपत्ती व्यवस्थापन

प्रा. रा. ना. घाटोळे – समाजशास्त्रीय संशोधन – तत्व व पद्धती


https://www.iipa.org.in>cms>public>

https://maharashtratimes.com/government-policy/central-government-policy/development-of- women-and-children-in-rural-areas-part-2/articleshow/92537873.cms

सारणी १

आपण लघुउद्योग करण्याचं कारण

| अ. क्र. | लघुउद्योग करण्याचं कारण | आवक | प्रतिशत (:) |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक अडचणी | ०६ | २४ |
| २ | आर्थिक स्वातंत्र्य | ०५ | २० |
| ३ | स्वत:ची ओळख (कला, कौशल्य, आवड) | १४ | ५६ |
| | एकूण | २५ | १००: |




सारणी २

या लघुउद्योगातून आपली आर्थिक स्थिती

| अ. क्र. | या लघुउद्योगातून आपली आर्थिक स्थिती | वारंवारीता | प्रतिशत (:) |
|---|---|---|---|
| १ | चांगली | १९ | ७६ |
| २ | मध्यम | ०६ | २४ |
| ३ | निम्न | ०० | ०० |
| | एकूण | २५ | १००: |

